**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक १४ फेब्रुवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **पीएम ई-बस सेवा योजनेअंतर्गत देशातल्या चार शहरांसाठीच्या २२५ इलेक्ट्रिक बसेसचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे लोकार्पण.**
2. **नागपुरात पहिल्या टप्प्यातील ५० ई-बसेस नागरिकांच्या सेवेत रुजू.**
3. **नैसर्गिक शेतीचा अवलंब करण्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं आवाहन.**
4. **सुरेश वाडकर यांच्या गायनानं द्विदिवसीय खासदार ज्येष्ठ नागरिक सांस्कृतिक महोत्सवाचं नागपुरात उद्घाटन.**

---------------------------------------------------

पंतप्रधान नरेंद्र मोदी- ई-बस

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज आसाममधल्या दिब्रुगढमध्ये मोरान बायपास इथल्या आपत्कालीन परिस्थितीत विमानं उतरवण्यासाठीच्या धावपट्टींचं उद्घाटन केलं. आजच्या आसाम भेटीसाठी ते आज सकाळी याच धावपट्टीवर उतरले. भारतीय हवाई दलाच्या सहकार्यानं दिब्रुगढमधल्या एका राष्ट्रीय महामार्गालगत या धावपट्ट्या उभारल्या आहेत. आपत्कालीन परिस्थितीत लष्करी आणि नागरी विमानं उतरवणं आणि त्यांचं उड्डाण करण्यासाठी या धावपट्ट्या विकसित केल्या आहेत. या धावपट्ट्यांच्या उद्घाटनानंतर मोदींनी लढाऊ विमानं, वाहतूक विमानं आणि हेलिकॉप्टर्सच्या हवाई प्रात्यक्षिकांचीही पाहणी केली. पीएम ई-बस सेवा योजनेअंतर्गत देशातल्या चार शहरांसाठीच्या २२५ इलेक्ट्रिक बसेसला हिरवा झेंडा दाखवून त्यांनी रवाना केलं. त्यात नागपूर आणि भावनगरसाठीच्या प्रत्येकी ५०, गुवाहाटीसाठी १०० आणि चंदीगडसाठीच्या २५ बसचा समावेश आहे.

---------------------------------------------------

पीएम ई-बस:

पीएम ई-बस सेवा या योजनेअंतर्गत नागपूर शहराला 150 बसेस मंजूर झाल्या असून या अंतर्गत पहिल्या टप्प्यात 50 बसेसचं लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दूरदृश्य प्रणाली द्वारे झालं. अर्ध्या तासाच्या चार्जिंगमध्ये ही बस 250 किलोमीटर अंतर पार करू शकते. ही बस 9 मीटर लांब असून याची प्रवासी

क्षमता 25 अशी आहे. या बससेवेमुळे नागपूर शहरातील वाहतुकीला गतिमानता मिळेल, असा विश्वास याप्रसंगी नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री आणि राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. या बसचा लोकार्पण सोहळा नागपूरच्या कोराडी इथल्या बस डेपोमध्ये पार पडला. या डेपोमध्ये 1 मेगा वॅट क्षमतेचा सौर विदयुत प्रकल्प असून याद्वारे या बसेसचं चार्जिंग होणार असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

***(होल्ड बाईट -बावनकुळे- १९ सेकंद)***

***सोलर वरच आता ही चार्जिंग होणार आहे. त्यामुळे एक मेगा वॉट सोलर प्रोजेक्ट ऑलरेडी या ठिकाणी आहे. या बसेस इथे चार्ज होणार सव्वा दोनशे किलोमीटर एका चार्जिंगनी आणि तीस मिनिटात एक बस चार्ज होणार आहे. त्यामुळे सोलरचा एक प्रोजेक्ट आहे आणि आधुनिक आणि अॅडव्हान्स जे देशातली जगातली सर्वात अॅडव्हान्स टेक्नॉलॉजी आहे ती यामध्ये वापरली गेली आहे.***

यावेळी नागपूर महानगरपालिकेच्या महापौर निता ठाकरे आणि स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

-----------------------------------------------------

पीयुष गोयल

भारत-अमेरिका व्यापार कराराबाबत काँग्रेस नेता राहुल गांधी यांनी केलेले आरोप खोटे असल्याचा पुनरुच्चार केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियुष गोयल यांनी केला. या करारात शेतकऱ्यांच्या हिताचा पूर्ण विचार केलेला आहे आणि या करारामुळे शेतकरी, मासेमार, युवा, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग, स्टार्टअप्स, कारागीर आणि विश्वकर्मा यांना फायदा होईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. विविध देशांबरोबर झालेल्या मुक्त व्यापार करारांबद्दल ते म्हणाले…

***(होल्ड बाईट- पियुष गोयल)***

-----------------------------------------------------

पुलवामा आदरांजली

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१९ मध्ये पुलवामा दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना आदरांजली वाहिली. सुरक्षा जवानांच्या बलिदानाचं देश कायम स्मरण करेल, असं उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी समाजमाध्यमांवरील पोस्टमध्ये म्हटलं आहे. शहीद जवानांच्या दुर्दम्य साहसातून प्रत्येक भारतीयाला प्रेरणा मिळेल, अशा शब्दांत मोदी यांनी समाजमाध्यमावरील संदेशातून आदरांजली वाहिली. शहिदांचं बलिदान सीमापार

दहशतवाद खपवून न घेण्याचा देशाचा निर्धार आणखी बळकट करतं, असं परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी संदेशात म्हटलं आहे.

-----------------------------------------------------

हर्षवर्धन सपकाळ

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची तुलना टिपू सुलतान याच्यासोबत केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र टीका केली आहे. नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी सांगितलं की टिपू सुलतान सारख्या क्रूर शासनकर्त्यांनं लाखो हिंदूंची हत्या केली होती. त्याची तुलना शिवाजी महाराजांसोबत करणं हे काँग्रेसचं मतांसाठी लांगुलचालन आहे. याबद्दल काँग्रेसनं आणि त्यांच्या प्रदेशाध्यक्षांनी देशाची माफी मागावी आणि काँग्रेसच्या मित्र पक्षांनी सुद्धा याबाबत भूमिका स्पष्ट करावी, असं ते म्हणाले.

-----------------------------------------------------

देवेंद्र फडणवीस

रासायनिक खतांमुळे कमी होत असलेल्या उत्पादकतेच्या पार्श्वभूमीवर सर्व शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीचा वापर करावा, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. ते आज परळी इथं आयोजित महा पशुधन एक्स्पो-२०२६ या प्रदर्शनात पशुपालकांशी संवाद साधताना बोलत होते. उत्तम रोजगार निर्मिती करण्यासाठी शेतीला जोड व्यवसाय आवश्यक असून राज्यातला शेती विकास आणि उत्पादकता वाढवण्यासाठी ५०० कोटी रुपयांचं मिशन राबवण्यात येत असल्याचंही त्यांनी सांगितलं. शेती पुन्हा फायदेशीर करण्यासाठी आणि पशुधन सुरक्षित करण्यासाठी वैरण विकास उपक्रम हाती घेतला जाणार असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

-----------------------------------------------------

कर्करोग उपचार

कर्करोग उपचार क्षेत्रात परस्पर तंत्रज्ञान आणि ज्ञानाची देवाण-घेवाण, क्षमता बांधणी आणि उन्नत रुग्णसेवेसाठी रिपब्लिक ऑफ गयाना आणि नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट नागपूर यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. नागपुरात नॅशनल कॅंसर इन्स्टिट्यूट इथं आयोजित ऑन्कॉलॉजी बियॉन्ड बॉर्डर्स या जागतिक परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. रोगांवरील उपचार सीमांनी मर्यादित राहू शकत नाहीत, त्यामुळे आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञान आत्मसात करणं आवश्यक असल्याचं मत फडणवीस यांनी व्यक्त केले.

दिवसेंदिवस वाढत असलेल्या कर्करोगाच्या रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर हा करार अत्यंत महत्त्वाचा ठरणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

-------------------------------------------------------

अन्न आणि  औषध प्रशासन

अन्न आणि  औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य वाशिम कार्यालयानं अनसिंग इथं धडक कारवाई करत दोन गंभीर प्रकरणं उघडकीस आणली. आई मेडिकल स्टोअर इथं वैध प्रिस्क्रिप्शनशिवाय गर्भपात औषधांची विक्री आणि अनधिकृत साठा आढळून तो जप्त करण्यात आला. तसेच खडसिंगी-अनसिंग परिसरात वेग्रा-१०० मि.ग्रॅ. (सिल्डेनाफिल सायट्रेट) या औषधांचा २५३ पट्ट्यांचा अवैध साठा जप्त करण्यात आला. जप्त औषधांची अंदाजित किंमत २० हजार ४४८ रुपये असून पुढील कारवाई सुरू आहे.

-------------------------------------------------------

खासदार ज्येष्ठ नागरिक

कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित खासदार ज्येष्ठ नागरिक सांस्कृतिक महोत्सवाचं आज उद्घाटन झालं. पद्मश्री सुरेश वाडकर यांच्या अजरामर गीतांनी सभागृहातील ज्येष्ठ नागरिक मंत्रमुग्ध झाले असून मोठ्या गर्दीनं पहिला दिवस गाजला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि ज्येष्ठ नेते दत्ता मेघे यांच्या संकल्पनेतून महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. उद्घाटनप्रसंगी प्रसिद्ध अभिनेत्री पद्मिनी कोल्हापुरे यांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन करण्यात आलं. सुरेश आणि पद्मा वाडकर यांच्या सादरीकरणाला रसिकांची उत्स्फूर्त दाद मिळाली. सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी डॉ. हरिभाऊ कानडे आणि डॉ. संजीव चौधरी यांचा सत्कार करण्यात आला. उद्या रविवारी सलील कुळकर्णी-संदीप खरे यांचा ‘आयुष्यावर बोलू काही’ हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

-------------------------------------------------------

मराठी वाङ्मय

२०२४ या वर्षासाठीचे मराठी भाषेतील उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मितीसाठीचे यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार काल राज्य शासनातर्फे जाहीर करण्यात आले. प्रौढ वाङ्मय, बाल वाङ्मय, प्रथम प्रकाशन आणि सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कार अशा चार प्रकारांमध्ये एकंदर ३५ पुरस्कार जाहीर झाले आहेत.

-------------------------------------------------------

‘उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार’

राज्य शासनाच्या माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयामार्फत २०२५ या वर्षासाठी राज्यस्तरीय तसंच विभागीय ‘उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार’ स्पर्धा जाहीर करण्यात आली असून, या विविध श्रेणीतील पुरस्कारांसाठी इच्छुक पात्र उमेदवारांकडून १५ मार्च २०२६ पर्यंत प्रवेशिका मागवण्यात येत आहेत. यावर्षी देखील उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छ महाराष्ट्र जनजागृती असे पुरस्कार देण्यात येणार आहेत. हे पुरस्कार १ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या वृत्तांकनासाठी दिले जाणार असून याविषयीची सविस्तर माहिती आणि अर्ज नमुने maharashtra.gov.in आणि dgipr.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

-----------------------------------------------------

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत वाशिम जिल्हा रुग्णालय, वाशिम यांच्या वतीनं कोटपा कायदा २००३ अन्वये शहरातील पानटपरीधारकांवर कारवाई करण्यात आली. या संयुक्त कारवाईत कलम ६(अ) आणि ६(ब) चं उल्लंघन करणाऱ्या १८ पानटपरीधारकांवर दंडात्मक कारवाई करून ३ हजार ६०० रुपये दंड वसूल करण्यात आला.

-----------------------------------------------------